**प्रेसनोट** **ता. २४/०६/२०२३**

**धार्मीक भावना दुखावण्याचा प्रयत्न केल्यास कडक कारवाई करण्याचा पोलीसांचा इशारा, चिखली पोलीस ठाणे हद्दीत कुदळवाडी येथे शांतता समितीची व मुस्लीम बांधव यांची बैठक**

---

दिनांक २३/०६/२०२३ रोजी सायं. १९.४५ ते २०/१५ वा. चे दरम्यान मस्जिद ए नईम कुदळवाडी येथे मा. श्री. डॉ. श्री. काकासाहेब डोळे, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड आुक्तालय यांचे अध्यक्षतेखाली व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर काटकर, चिखली पोलीस ठाणे यांचे उपस्थितीत दिनांक २९/०६/२०२३ रोजी मुस्लीम बांधवाच्या बकरी ईद सनानिमीत्त बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकिमध्ये सध्या सोशल मिडीयाव्दारे दोन जातिमध्ये तेड निर्माण करणारे संदेश पोस्ट होताना दिसुन आल्यास पोलीस त्यावर लक्ष ठेवून असून अशा समाज कंठकांवर पोलीसांमार्फतीने कडक कारवाई करण्यात येणार असलेबाबतचा इशारा मा. श्री. डॉ. श्री. काकासाहेब डोळे, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड यांनी दिला आहे. दिनांक २९/०६/२०२३ रोजी बकरी ईद व त्याच दिवशी आषाढी एकादशी असल्याने पोलीस स्टेशन हद्दीत गोवंश हत्याकरणार नाही. गोवंश हत्या करणारे कोणी मिळून आल्यास कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण न करता त्याबाबत तात्काळ पोलीसांना कळविणे बाबत अवाहन करण्यात आलेले आहे. चिखली पोलीस ठाणे हद्दीत जातिय सलोख्याची परंपरा आहे. त्याला आव्हान देणाऱ्या मंडळींवर कारवाई करावी. सदरबाबत स्थानिक नागरीक कोणीही हस्तक्षेप करणार नाही असा विश्वास शांतता कमिटीने व्यक्त केला. काही समाज कंठक वैयक्तीक झालेल्या भांडणातुन त्याला जातिय संबंध जोडण्याचा प्रयत्न करत असतात अशा समाज कंठकावर पोलीस लक्ष ठेवून असून त्यांचेवर कडक कारवाई करण्यात येईल. बकरी ईद व आषाढी एकादशीच्या दिवशी कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचेवर कडक कारवाई करणार असलेबाबत सुचना व मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. सदर बैठकिचे वेळी ज्ञानेश्वर काटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिखली पोलीस स्टेशन, नकुल न्यामणे, सहा. पोलीस निरीक्षक, चिखली पोलीस स्टेशन, यांचेसह नईम शेख, याकुब खान, उमर फारुख शेख, आकिब मोमिन, के. डी. वाघमारे, सुखदेव नरळे, तसेच शांतता कमिटीचे सदस्य, कुदळवाडी येथील १९ मस्जिदीचे पदाधिकारी व १०० ते १५० मुस्लीम बांधव उपस्थित होते.

**( डॉ. श्री. काकासाहेब डोळे)**
पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२,
पिंपरी चिंचवड आुक्तालय